तयानें रात्रीचा दिवस करून । अभ्यास केला अति कसून ॥
सहज ज्योतीषास केला प्रश्न । परिक्षेंत उत्तीर्ण होईनका ॥ १०१ ॥

चाळूनि पंचांगाचीं पानें । ज्योतिषी पाही ग्रहांचीं स्थानें ॥
राशी नक्षत्रें मोजूनि बोटानें । सचिंत मुद्रेनें अवलोकी ॥ १०२ ॥

म्हणे केलांत परिश्रम थोर । परि ये वर्षीं न ग्रहांचें जोर ॥
पुढील वर्ष फार श्रेयस्कर । परिक्षा निर्धोर ते वर्षीं ॥ १०३ ॥

बैसून परिक्षेस काय सार्थक । होणार जरी श्रम निरर्थक ॥
विद्यार्थ्यानें हा घेतला वचक । तेणें तो कचकला मनासी ॥ १०४॥

पुढें तया विद्यार्थ्याची माता । अल्पावकाशीं शिरडीस जातां ॥
नमितां साईचरण माथां । कुशल वार्ता चालल्या ॥ १०५ ॥

निघाली तैंही ही कथा । करुणा वचनीं बाबांसीं प्रार्थितां ॥
म्हणे मुलगा परिक्षेस बसता । असती अनुकूलता ग्रहांची ॥ १०६ ॥

पत्रिका पाहिली ज्योतिषांहीं । म्हणती यंदा योग नाहीं ॥
असून अभ्यासाची तयारीही । मुलगा न जाई परिक्षेस ॥ १०७ ॥

तरी बाबा ही काय ग्रहदशा । यंदा असी कांहीं निराशा ॥
पडेल एकदां पदरीं परिक्षा । ऐसी बहु आशा समस्तां ॥ १०८ ॥

ऐकून बाबा वदले वचन । सांगे तयास माझें मानें ॥
पत्रिका ठेवी गुंडाळून । बैसे जा स्वस्थ मन परिक्षे ॥ १०९ ॥

नादा कुणाच्या लागूं नका । जन्मपत्रिका पाहूं नका ॥
सामुद्रिका विश्वासूं नका । चालवा निका अभ्यास ॥ ११० ॥

म्हणावें मुलास येईल यश । स्वस्थ चित्तें परिक्षेस बैस ॥
होऊं नको असा निराश । ठेवी विश्वास मजवरी ॥ १११ ॥

---

१ बसला असता. २ ऐक.

असो बाबांची आज्ञा घेऊनी । आई परतली ग्रामालागुनी ॥
मुलास बाबाचा निरोप कथुनी । उत्साहे जननी आश्वासी ॥ ११२ ॥

ऐसा तो साईवचनोल्हास । मुलगा बैसला परिक्षेस ॥
उत्तरेंही लेखी प्रश्नांस । यथावकाश दीधलीं ॥ ११३ ॥

लेखी परीक्षा पूर्ण झाली । उत्तरेंही संपूर्ण लिहिली ॥
परी आत्मा[1]विश्वासें घेरली । संशयें चळली स्थिरबुद्धि ॥ ११४ ॥

असतां लिहिलीं सम्यगुत्तरें । उत्तीर्ण व्हावया तितुकीं पुरे ॥
परी विद्यार्थिया वाटे तें अपुरें । सोडिलें धीरें तयातें ॥ ११५ ॥

वस्तुतः लेखी परिक्षेंत पास । होता तरी त्यास वाटे मी नापास ॥
तेणें होऊन तो उदास । तोंडी परिक्षेस बैसेना ॥ ११६ ॥

तोंडी परिक्षेस आरंभ झाला । प्रथम दिवस तैसाच गेला ॥
दुसरे दिवशीं एक स्नेही आला॥विद्यार्थी देखिला भोजनास्थित॥११७॥

म्हणे ही काय आश्चर्यता । परिक्षकाला तुझी चिंता ॥
तो म्हणे जा पाहून ये आतां । तेंडूलकर नव्हता कां काल ॥११८॥

लेखी परिक्षेंत तो नापास । तया तोंडीचे किमर्थ सायास ॥
म्हणून घरीं तो बैसला उदास । स्पष्ट मी तयास सांगितलें ॥११९॥

तेव्हां परिक्षक वदे तूं जाई । असेल तैसा घेऊन येई ॥
'लेखी परिक्षेंत पास' ही देई । आनंददायी खबर त्या ॥ १२० ॥

मग तो आनंद काय पुसावा । केला महाराज साईचा धांवा ॥
न घेतां एक क्षणाचा विसावा । उल्हास भावा धांवला ॥ १२१ ॥

असो पुढें जाहलें गोड । परिक्षेची पुरली होड ॥
दिधली दृढ निजपदीं जोड । साईनीं कोड पुरवुनी ॥ १२२ ॥

---

१ स्वतःबद्दल स्वतःसच असलेला अविश्वास.

दळावयाचे जात्याचा खुंट। हालहालवूनि बसविती धट्ट ॥
तैसीच गुरुपदनिष्ठेची गोष्ट। हालवूनि चोखट साई करी ॥ १२३ ॥

ऐसें न कोणा केव्हांही कथिती। जेणें न हालेल चित्तवृत्ती ॥
हे तो बाबांची नित्य प्रचीती। निष्ठा येरी तीं दृढ करिती ॥ १२४ ॥

चालूं जातां कथिल्या वाटे। आरंभा आरंभीं गोड वाटे ॥
पुढें ऐसे पसरितील सराटे। कांटेच कांटे चोहींकडे ॥ १२५ ॥

मग त्या निष्ठेस फुटतील फांटे। सहज मनीं संशय दाटे ॥
किमर्थ साई या आड वाटे। आणी हें वाटे मनाला ॥ १२६ ॥

परी हें ऐसें जेथें वाटे। तेथेंच श्रद्धा धरा नेटें ॥
कसोटीच हीं प्रत्यक्ष संकटें। तेणेंच पैठे दृढ श्रद्धा ॥ १२७ ॥

देऊनियां संकटां तोंड। करितां साई स्मरण अखंड ॥
होतील सकळ अपाय दुखंड। शक्तिही प्रचंड नामाची ॥ १२८ ॥

हेंच या अंतरायांचें प्रयोजन। तेंही करी साईच निर्माण ॥
तेव्हांच घडेल साईस्मरण। संकटोपशमनही तेव्हांच ॥ १२९ ॥

असो याच मुलाचे वडील। भक्त बाबांचे अति प्रेमळ ॥
धीर उदार सत्वशील। गात्रें शिथिल जाहलीं ॥ १३० ॥

प्रसिद्ध परदेशीय व्यापारी। पेढी जयांची मुंबई शहरीं ॥
इमानें इतबारें तयांचे पदरीं। केली नोकरी तयांनीं ॥ १३१ ॥

पुढें होतां वृद्धापकाळ। नेत्रांस येऊं लागली झांकळ ॥
इंद्रियें निजकार्यीं विकळ। वांछिती निश्चळ आराम ॥ १३२ ॥

काम कराया उरली न शक्ति। म्हणून सुधारावया प्रकृती ॥
रघुनाथराव रजा घेती। स्वस्थ विश्रांती भोगिती ॥ १३३ ॥

पुढें ती रजा संपूर्ण भरली। नाहीं पूर्ण विश्रांती लाभली ॥
म्हणून मागुती अर्जी लिहिली। रजा प्रार्थिली आणीक ॥ १३४

अर्जी देखूनियां उपरी[१] । अपेक्षित रजेची शिफारस करी ॥
परी त्या पेढीचे वरिष्ठाधिकारी । पूर्ण विचारी दयाळू ॥ १३५ ॥

धनी मनाचा उदार । पाहूनि अपुला इमानी चाकर ॥
देई प्रेमाची अर्धी भाकर । पुढील चरितार्थ चालावया ॥ १३६ ॥

ऐसी ही सरकारी पद्धत । उत्तम पेढ्याही प्रसंगोपात ॥
प्रामाणिक सेवकांनिमित्त । उत्तेजनार्थ अवलंबिती ॥ १३७ ॥

परी ही भाकर माझा धनी । देईल काय मजलागुनी ॥
पडेन जेव्हां मी बेकार[२] होऊनी । ऐसिया चिंतनीं पडले ते ॥ १३८ ॥

दीडशें अवघा माझा पगार । पाऊणशेंच्या पेन्शनावर
पडेल दिनचर्येचा भार । मनांत विचार घोळत ॥ ३९ ॥

परी पुढें जाहली मौज । पहा बाबांचे नवल भोज ॥
रघुनाथरावांचे कुटुंबा हितगुज । पुसती तें चोज[३] परिसिजे ॥१४०॥

अखेरचा हुकुम व्हावया आधीं । असतां पंधरा दिसांचा अवधी ॥
जाऊनि तियेच्या स्वप्नामधीं । पुसती बुद्धी तियेस ॥ १४१ ॥

शंभर द्यावे माझी मनीषा । पुरेल ना तव मनीची आशा
बाई वदे हें काय पुसा । आम्हा भरंवसा अपुलाच ॥ १४२ ॥

तिकडे ठराव अर्जीवर । रघुनाथराव इमानी नोकर ॥
बहुत जाहली सेवा आजवर । अर्धी[४] भाकर द्यावी त्यां ॥ १४३ ॥

मुखें जरी वदले शंभर । दहा दिधले आणीक वर ॥
ऐसे हे समर्थ करुणाकर । प्रेम अनिवार भक्तांचें ॥ १४४ ॥

आतां परिसा आणीक एक । कथा सुंदर मनोरंजक ॥
भक्तप्रेमोल्हासकारक । आनंददायक श्रोतयां ॥ १४५ ॥

---

१ वरिष्ठ. २ नोकरी विरहित ३ कौतुक. ४ अर्धे पगाराचें पेन्शन.

डॉक्टर नामें क्यापटन हाटे । बाबांचे भक्त श्रद्धाळू मोठे ॥
बाबांनीं स्वप्नांत दर्शन पहाटे । दिधलें तें गोमटें कथानक ॥ १४६ ॥
हाटे राहती विकानेरीं । बाबांस देखती स्वप्नामाझारीं
पहा बाबांची प्रश्न कुसरी । हाटेही उत्तरीं काय वदती ॥ १४७ ॥
म्हणती बाबा मज विसरलासि काय। तात्काळ हाट्यांनीं धरिले पाय॥
जरी विसरलें लेंकरूं माय। तरणोपाय कैसेनी ॥ १४८ ॥
उठून बागेंत गेले तातडी । खुडिली ताजी वालपापडी ॥
शिधा साहित्य दक्षिणा रोकडी । भक्ति परवडी सिद्ध केली ॥१४९॥
ऐसी पाहोनि सिद्धी पूर्ति । हाटे तें सूप जों समर्पू सरती ॥
अवचित उघडलीं नेत्रपातीं । स्वप्न स्थिती हें तैं कळलें ॥ १५० ॥
तात्काळ हाट्यांचें जाहलें मन । पदार्थ हे समस्त मिळवून ॥
करावे बाबांस प्रत्यक्ष अर्पण । तदर्थ जाऊन शिरडीस ॥ १५१ ॥
परी ते तेव्हां ग्वालेरीस । पत्र लिहिलें मुंबईस ॥
वृत्तांत साद्यंत कळविला स्नेह्यास। विनविले शिरडीस जावें स्वयें॥१५२
टपाल मार्गें येईल पैसा । शिधा घ्यावा योग्य तैसा ।
शेंगा पापडीच्या सुंदर खाशा । मिळवाव्या कैशातरीही ॥ १५३ ॥

---

Extract from Captain Hate's letter dated Xmas Lashkar, Gwalior C. I. Addressed to Mr H S Dikshit.

"Though I am miles away the favour that Sai Baba Sad guru shows on me is Marvellous. Duty keeps me here, but will take the first opportunity of Comming to Shirdi.

My humble respects to Sai Baba.

I have sent a M o. of Rs. twelve only. Please give Rs. 10 as "Dakshiana" and Rs. 2 should be spent in buying ghee, wheat flour, Dal etc as shidha." Please do keep on it. Vegetable of वालपापडीच्या शेंगा All this shidha etc. has a special meaning and I shall be highly Obliged to you for this fauour of yours.

उरला पैका सर्व न्यावा । शिष्यासमवेत बाबांस द्यावा ॥
चरण वंदूनि प्रसाद मागावा । तो मज द्यावा पाठवून ॥ १५४ ॥
पैसा येतांच स्नेही निघाले । शिरडीस जाऊन सामान घेतलें ॥
पापडीवांचून किंचित अडलें । तों एक टोपलें तें आलें ॥ १५५ ॥
तें होतें जिये बाईचे माथां । तियेस बोलाऊन पाहूं जातां ॥
शेंगाच पापडीच्या लागल्या हाता । अति आश्चर्यता सकळां तें ॥१५६
मग तें सर्व साहित्य आणिलें । महाराजांसीं सादर केलें ॥
त्यांनीं निमोणकरांतें दिधलें । उदयीक निवेदिलें[1] शिजवून ॥१५७॥
पढें बाबा भोजना बैसतां । वरण भातादिकां न शिवतां ॥
शेंगाच तेवढ्या उचलून घेतां । आश्चर्य समस्तां वाटलें ॥ १५८ ॥
शेंगाच तेवढ्या ग्रहण केल्या । त्याच तेवढ्या मुखीं घातल्या ॥
हाट्यांना बहु आनंद झाला । वृत्तांत कळला हा तेव्हां ॥ १५९ ॥
जया मनीं जैसा भाव । तैसाच कीं हा हाट्यांचा अनुभव ॥
पुढील कथेचा परिसा नवलाव । गोड लाघव साईचें ॥ १६० ॥
साईहस्तस्पर्शपूत । असावा एक रुपया गृहांत ॥
इच्छा उद्भवली हाट्यांचे मनांत । पुरवीत मनोगत तो साई ॥१६१ ॥
मनाच्या वृत्ती कोट्यान कोटी । त्यागून ओखटी धरावी गोमटी ॥
मग पहा साईची कैसी हतवटी । उभाच पाठीं भक्तांच्या ॥ १६२ ॥
होतां ऐसी सदिच्छा निर्माण । सफळ व्हावया नलगे क्षण ॥
निघाला एक स्नेही तत्क्षण । साईदर्शनकामुक ॥ १६३ ॥
वृत्ती असावी मात्र गोड । नवल साई पुरवितो होड ॥
जया सद्वृत्तीची आवड । तयाचें कोड त्या हातीं ॥ १६४ ॥
तंव हाटे एक रुपया देती । तया स्नेह्यासीं अति प्रीती ॥
म्हणती नका पडूं देऊं विस्मृती । घाला हा हातीं बाबांच्या ॥ १६५

१ नैवेद्य केला.

स्नेही जेव्हां शिरडीस गेले । तात्काळ बाबांचे दर्शन घेतलें ॥
चरण तयांचे माथां वंदिले । सन्मुख बैसले बाबांचे ॥ १६६ ॥
दक्षिणेलागीं कर पसरितां । अपुली दक्षिणा दिधली प्रथमता ॥
बाबांनी खिशांत सूदिली अविलंबता॥काढीता मागुता हाटयांची॥१६७
तोही रुपया जोडूनि कर । ठेवी बाबांचे करतलावर ॥
म्हणे ही दक्षिणा मजबरावर । हाटे डॉक्टर पाठविती ॥ १६८ ॥
हा साई सर्वहृदयवासी । हाटे जरी ग्वालेरनिवासी ॥
जाणूनि मनीषा तयांचे मानसीं । बैसले रुपयासीं न्याहाळीत ॥१६९॥
होऊनियां प्रेमोन्मुख । बाबा रुपया धरिती सन्मुख ॥
नवल अवलोकिती लावोनि टक । लोक टकमक देखती ॥ १७० ॥
दक्षिणांगुष्टें वरचेवरी । उडवूनि झेलिती बाबा निजकरीं ॥
ऐसी क्रीडा करूनि क्षणभरी । रुपया करीत ते परत ॥ १७१ ॥
म्हणती हा ज्याचा त्यास देई ॥ सवें हा उदीचा प्रसाद नेई ॥
नलगे आम्हास तुझें कांहीं । स्वस्थ राही म्हणे तया ॥ १७२ ॥
घालून लोटांगण बाबांचे पायीं । उदी प्रसाद पाऊनि ठायीं ॥
घेऊनि बाबांची आज्ञा तो स्नेही।आला निज गेहीं ग्वालेरीस॥१७३॥
आलियावरी ग्वालेरीतें । रुपया देऊनि डॉक्टरातें ॥
कळविलें सकळ वृत्तांतातें । दाटलें भरतें हाटयातें ॥ १७४ ॥
म्हणे मनीं जैसा हेत । केला होता जैसा संकेत ॥
जाणोनि माझें मनोगत । पुरविला मनोरथ बाबांनीं ॥ १७५ ॥
ऐसें वाटलें हाटयांचे मना । परी ही तरी त्यांची कल्पना ॥
कोण जाणील संतांची योजना । प्रयोजना तयांच्या ॥ १७६ ॥
हे जरी म्हणावें निश्चित । तीच पहा दुसरी प्रचीत ॥
ती तों याहून विपरीत । ज्याचें मनोगत त्या ठावें ॥ १७७ ॥

एकाचा रुपया परत देती । एकाचा तो खिशांत सूदती ॥
कारण काय वदावें निश्चिती । काय चित्तीं बाबांच्या ॥ १७८ ॥

त्यांचीं कारणे तयांस ठावी । आपण केवळ मौज पहावी ॥
ऐसी गोड संधी न दवडावी । कथा परिसावी ये अर्थी ॥ १७९ ॥

एकदां वामन नार्वेकर । जयांस बाबांचें प्रेम अपार ॥
आणिला एक रुपया सुंदर । भक्तिपुरःसर अर्पाया ॥ १८० ॥

एका बाजूस कोरिली होती । राम लक्ष्मण सीतासती ॥
दुजिया बाजूस रम्य मूर्ति । होता मारुती बद्धांजुळी ॥ १८१ ॥

तया अर्पणीं पोटीं हेत । हस्तस्पर्शा पाठीं तो परत ॥
मिळावा उदी प्रसादासहित । म्हणून हस्तांत ठेविला ॥ १८२ ॥

कोणा मनीं काय हृद्गत । बाबा हे तों सकळ जाणत ॥
परी तो रुपया पडतां हस्तांत । तात्काळ खिशांत सूदिला ॥ १८३ ॥

वामनरावाचा मानस । माधवरावांनीं[१] कळविला बाबांस ॥
रुपया परत करावयास । विनविलें तयांस अत्यंत ॥ १८४ ॥

" त्याला कसला द्यावयाचा । आपणासची तो ठेवावयाचा " ॥
वदले बाबा स्पष्ट वाचा । वामनरावाच्या समक्ष ॥ १८५ ॥

" तरीही तो देईल । रुपये पंचवीस याचें मोल " ॥
" हा मी यासीं देईन बदल । म्हणाले " बोल तयाला ॥ १८६ ॥

मग त्या एका रुपायालागीं । वामनरावानें लागवेगीं ॥
तेही मिळवून जागोजागीं । बाबालागीं दीधले ॥ १८७ ॥

तेही पूर्ववत खिशांत ठेविले । म्हणती रुपयांचे ढिगार लाविले ॥
तरी त्या रुपयासवें न तोले । उणें ते मोलें तयापुढें ॥१८८॥

म्हणती शामा हा तूं घेई । असूंदे हा अपुले संग्रहीं ॥
देव्हाऱ्यामाजीं ठेवून देई । करीत जाई पूजन ॥ १८९ ॥

---

१ माधवराव देशपांडे.

आतां हें ऐसें काय करितां । विचारावयाची कोणास सत्ता ॥
साई योग्यायोग्य जाणता । देता घेता समर्थ ॥ १९० ॥

असो आतां ही कथा आटपतां । विसावा देऊं श्रोतयां चित्ता ॥
जेणें मनन आणी निदिध्यासता । कथा परिसतां घडावी ॥ १९१ ॥

केलें काय एकलें श्रवण । पचनीं न पडे मननावीण ॥
वरी न घडतां निदिध्यासन । श्रवण निष्कारण होईल ॥ १९२ ॥

तरी हेमाड साईसी शरण । मस्तकीं धरीं साईचे चरण ॥
सकळ साधनांचें हें साधन । पुढील निवेदन पुढारां ॥ १९३ ॥

इति श्री साई संतसज्जनप्रेरिते । भक्त हेमाडपंत विरचिते ॥
श्रीसाई समर्थ सच्चरिते । स्वप्न कथाकथनं नाम ॥
एकोनत्रिंशत्तमोऽध्यायः संपूर्णः ॥

॥ श्री सद्गुरु साईनाथार्पणमस्तु शुभं भवतु ॥

साल मजकूर गुरुपौर्णिमेनिमित्त शिर्डी येथील कार्यक्रम खालीलप्रमाणें ठरला आहे.

५ जुलई ( रविवार ) संस्थानांत कमिटी मीटींग तिसरे प्रहरीं ४वाजतां.

६ जुलई ( सोमवार ) श्रीची पूजा व प्रसाद. पुराण ३ वाजतां दुपारीं भक्त मंडळाची सभा तिसरे प्रहरीं ४ वाजतां. रथ रात्रौ ९ वाजतां.

७ जुलई ( मंगळवार ) गोरगरीबांस भोजन, रात्रौ कीर्तन.

८ जुलई ( बुधवार ) भजन रात्रौ चावडींत पालखी नेणे व तेथें आरती.

९ जुलई ( गुरुवार ) सकाळीं काला व दुपारीं तीर्थप्रसाद

## श्रीसद्गुरुसाईनाथ प्रसन्न

सालाबादप्रमाणें श्रीगुरु पौर्णिमेचा उत्सव मिति आषाढ शुद्ध १५ रोज सोमवार ता. ६ माहे जुलै सन १९२५ रोजीं श्रीक्षेत्र शिर्डी येथें होणार आहे. तरी आपण सदर प्रसंगीं येण्याची कृपा करावी अशी विनंती आहे.

कोपरगाव स्टेशनावरून शिर्डीस जाण्यासाठीं आपल्याला बैलगाडी हवी असल्यास ४ दिवस अगाऊ श्री संस्थान कमिटीचे चिटणीस यांस शिर्डी मुक्कामीं लिहून कळवावें म्हणजे गाडीची व्यवस्था करण्यांत येईल.

भक्तमंडळाची वार्षिक वर्गणी कोणाकडे येणें राहिली असल्यास ती कृपा करून पाठवून द्यावी.

उत्सवाप्रीत्यर्थ कांहीं पाठविणें असल्यास चिटणिसाकडे पाठवावें.

श्री [illegible] प्रसन्न

# श्री साईलीला

## मासिक पुस्तक

वर्ष ३ रें.] आषाढ शके १८४७ [अंक ४ था.

नलिनीदलगतजलमतितरलम् । तद्वज्जीवितमतिशयचपलम्॥



क्षणमपि सज्जनसंगतिरेका । भवति भवार्णवतरणे नौका ॥

श्री शंकराचार्य.

संपादकः—लक्ष्मण गणेश महाजनी.

प्रकाशक.—रामचंद्र आत्माराम तर्खड

श्री साईलीला कचेरी ५ टर्नर रोड बांद्रे. बी. बी. रेल्वे.

# अनुक्रमणिका.

| | |
|---|---|
| महाराजांचे अनुभव ... ... ... ... | २४५–२६२ |
| महाराजांची बोधपद्धति ... ... ... | २५–२६ |
| स्फुट विषय ... ... ... ... ... | २२७–२३४ |
| श्री साईसच्चरित ... ... ... ... | ५०७–५२८ |

---

## विनंती

या मासिकाचें वर्ष चैत्रापासून सुरू असते. अजून शके १८४६ चीही वर्गणी कित्येकांची आलेली नाही. गेल्या फाल्गुनाचे अंकांत आग्रहाची विनंती केली असूनही पुष्कळ वर्गणीदारांकडून शके १८४७ सालची वर्गणी अजून आलेली नाहीं. तरी वर्गणीदार आपली वर्गणी वेळेवर पाठवतील अशी उमेद आहे.

---

## वर्गणीचे दर

वार्षिक टपाल खर्चासह मनिआर्डरीनें अगाऊ रु. ३।≈ व्ही. पी. नें रु. ३॥≈, चालू अंकाची -।≈, मागील अंक शिल्लक असल्यास -॥-.

## नोटीस.

या मासिकासंबंधानें पत्रव्यवहार करणें तो खालीं सही करणार यांच्या नांवानें खालीं लिहिलेल्या पत्त्यावर करावा.

गोविंद रघुनाथ दाभोळकर.

श्रीसाईलीला ऑफीस. ५ सेंट मार्टिन्स रोड, वांद्रे. बी. बी. रेल्वे.

---

12-3-12.

We saw Sai Maharaj go out. I went to see him after he returned to the Musjid. As I sat down Sayin Sahib said "People are very ignorant When they do not see my physical body they think I am absent." He then said that he thought of Pimpalgaon this morning Then met four men from it and they followed him to the Musjid. The conversation somehow turned to topics connected with weddings and Sayin Sahib pointing to the new wall that is being built said that there used to be a passage there and a thin tree. An old man sat there and he was very pious. He had come from Jalna and did not care to return for over twelve years though his brother and family suffered very much during his absence At last he was prevailed upon to return. He did so on horseback and Sayin Sahib accompanied him in a cart, arrived at Jalna, the old man stayed with his wife and four grown up sons that he had, and then suddenly decided to marry the daughter of his brother The wedding took place though every one laughed it to scorn. The bride was very young. At last she grew up and the old man had a son by her. Then the old man died when the son grew to six years of age. The boy was poisoned by Biradars. The young widow and bereaved mother spent a chaste life, never remarried and eventually died. The boy was born again as Babu and died and is now born again in Bombay. Such is the artistic work of God.

13-3-12.

We saw Sayin Maharaj go out, and saw him later at the Musjid. He told a long story which in substance was that an old Patil used to visit him, that four and afterwards as many as twelve Govindas (Detectives) used to watch him that the old man and the Govindas had hard words and once had a serious scuffle. Sayin Sahib favoured the old man, visited him in this field and on one occasion hit the Govindas when they attacked him. At last the old man was removed to a large town for being dealt with, that Sayin Sahib intervened and got him released.

## LOKMANYA TILAK'S VISIT TO SHIRDI FROM SANGAMNER

19-5-1917.

I got up early in the morning, but so many people gathered that I could not pray There was a movement to keep us here and not let us go till after noon and Kelkar appeared to throw his weight on the side of the movement, but most unaccountably I felt angry and insisted upon starting. So after a Pansupari in the house of Mr. Sant, a leading pleader of Sangamner, we started about 8-30 a.m. We reached Shirdi, about 10 a.m., after a puncture on the way. We put up in Dixit's wada Bapu Sahib Bootee, Narayan Rao Pandi, and the establishment of Bootee were there. My old friends Madhawrao Deshpande, Balasahib Bhate, Bapusahib Jog, and others gathered. We went to the Musjid and paid our respects to Sayin Maharaj. I never saw him so much pleased before. He asked for Daxina as usual and we all paid. Looking at Lokamanya he said, "People are bad, keep yourself to yourself." I made my bow and he took some rupees from me Kelkar and Paregonkar also paid. Madhavrao Deshpande asked permission for us to proceed to Yeola. Sain Sahib said "why do you want to go in the heat to die on the way. Have your food here and then go in the cool of the afternoon. Shama, feed these people." So we stayed, had our food with Madhavrao Deshpande, lay down for a few minutes and then again went to the Musjid and found Sayin Maharaj lying down as if sleeping. People gave Lokmanya a Pansupari in the Chawadhi there and we returned to the Musjid again. Sayin Maharaj was sitting up and gave us udi and permission to go so we started by the motor.

## ॥ श्री साईनाथ सुप्रसन्न ॥

रा. रा. श्रीसाईलीला कर्ते यांस सा. न. वि. वि. महाराजांवर त्यांच्याच प्रेरणेने एक भूपाळी व एक आरती तयार केली आहे ती आरती व भूपाळी देण्यापूर्वी माहाराजाचे चरणीं माझी भक्ती कशी जडली हे लिहून कळविण्याची मी आपली परवानगी घेतों. ती आरती भूपाळी व ते अनुभव आपल्या सन्मान्य श्री साईलीलेच्या एखादे अंकात प्रसिद्ध करण्यास सविनय प्रार्थना आहे.

इ. स. १९१० सालीं माझे " सद्धर्म दीप " मासिक सुरू असतांना मी पैशाच्या काहीं अडचणींत होतों, त्या वेळीं एके दिवशीं मला एक स्वप्न पडले. स्वप्नांत पुणें येथील आर्यविजय छापखान्याचे मालक येऊन म्हणाले तुम्ही संकटांत कां पडलांत ? बार्शीजवळ वैराग आहे तेथे जा. तेथें एक सत्पुरुष आहेत, ते तुमचे संकट निवारण करतील. मी तेथे गेलों. तेव्हां असें पाहिले कीं एका झाडाखालीं एक सत्पुरुष तृणासनावर गुढघे उभे करून आणि हात उशाखालीं घेऊन उताणे पडले आहेत. मी त्यांच्या चरणावर मस्तक ठेवलें, आणि गहिंवरून प्रार्थना केली कीं, महाराज संकटांतून तारा, लागलीच महाराजांनीं परमेश्वर तुला मुक्त करील असें आश्वासन देऊन मला स्नान घालतोस का असे विचारलें. मी म्हणालों होय घालतों. जवळच एक ओढा होता. तेथें महाराजांना नेऊन स्नान घातलें. इतक्यांत एक मुलगा व एक मुलगी येऊन महाराजांना म्हणाली महाराज प्रसादाला चला. तेव्हां ते लागलीच मला म्हणाले तूं येतोस का ? मी होय म्हणालों. पुढें तीं लहान मुलें व पाठीमागें महाराज व त्यांच्या मागें मी असे चाललों असतां सर्वांच्या पुढें विठ्ठल मूर्ती चालली आहे, असें दिसलें. दिवस पाऊसकाळाचे असावेत सर्व रान हिरवळलें होते, आकाश अभ्राच्छादित होतें. एका बांधावरुन आम्ही चाललों होतों, इतके पाहून मी एकदम जागा झालों. नंतर मी त्या संकटांतून मुक्त झालों. कांहीं दिवसांनीं माझे परम मित्र श्री. रा. रा. देव मामलेदार ( त्यावेळीं हे डहाणूस होते. ) त्यांचे कनिष्ठ बंधु रा. रा.

गणपतराव देव, यांची माझी मुंबईस भेट झाली. त्या वेळी ते गुराच्या डॉक्टरीचा अभ्यास करीत होते. त्यांनीं मला शिरडीच्या महाराजांची कांहीं हकीगत सांगितली व ते ह्मणाले, "आमचे वडील बंधू शिरडीस गेले होते त्यांना तुह्मी त्यांची हकीगत विचारा." त्या दिवशीं मला वडोदे येथे जावयाचे होतें. मी निघून गेलो. त्यापूर्वी माझी व श्री. रा. रा. देव - मामलेदार यांची भेट झाली होती. त्यांना मी हें वरील स्वप्न सांगितलें होतें. त्यावेळीं त्यानीं मला इतकेंच उत्तर दिले कीं कोणा तरी सत्पुरुषाचें दर्शन तुह्माला होणार आहे. हें स्वप्न पडल्यावर सुमारे २ वर्षांनीं सन १९१२ सालीं मला लिव्हर झाल्यावर मी मुंबईहून डाहाणूस माझ्या मित्राकडे गेलों. तेथे त्यांनी डॉक्टराकडून औषधोपचार सुरु केले. प्रकृती साधारण सुधारत चालली होती, तेव्हां ह्मणजे ८-१० दिवसांनीं शिरडी येथे महाराजांच्या दर्शनास ते मला घेऊन गेले. जाताना औषधाची बाटली गुप्तपणानें बरोबर नेली होती. हे दिवस मार्गशीर्ष मासाचे होते. आह्मी सकाळीं कोपरगांवास जाऊन पोहोंचलों. थंडीचे दिवस, तशांतून मी फार अशक्त झालों होतो. तरी माझ्या मित्रांनीं गोदावरींत मला स्नान घातले. आमची सर्वांची स्नानें झाल्यावर आह्मी कोपरगावाहून टांग्यातून निघालों. शिरडीस सुमारें १० वाजतां पोहोंचलों. व भक्त शिरोमणी काकासाहेब यांचे वाड्यांत जाऊन उतरलों. नंतर आमच्या सामानाची व्यवस्था लागल्यावर आम्ही महाराजांच्या दर्शनास गेलों. माझे मित्र नेहमी एकटेच जात असत. या वेळीं ते कुटुंबांतील सर्व मनुष्यें घेऊन गेले होते. मशीदिच्या पायऱ्या च्यढून आम्ही वर जातों तोंच महाराजांनीं माझ्या मित्रास विचारिलें काय सावकार आलांत ? बरोबर किती माणसें आणलींत ? १०-१२ आणलीं म्हणून सांगितलें. हा महाराजांच्या अंतर्ज्ञानाचा पहिला मासला मला पहाण्यास मिळाला. आणखी महाराजांच्या अंतर्ज्ञानाचे २ अनुभव मला पाहण्यास मिळाले. आम्हीं महाराजांच्या चरणांवर मस्तकें ठेवलीं आणि यथाशक्ति दक्षिणाही दिली. परंतु त्या वेळेस मुलांच्या हातून आठ आठ आणे दक्षिणा द्यावयाची माझ्या मित्राच्या मनांतून होतें. परंतु नाणें न मिळाल्यामुळें उद्यां देऊं असें माझ्या मित्राच्या

मनांत आलें म्हणून मुलाच्या हातून दक्षिणा दिली नाहीं.म्हणून महाराजांनीं म्हटले मुलांकडून देवावयाची दक्षिणा २रु. आत्तांच देऊन टाक म्हणजे झाले हा दुसरा अनुभव झाला. तिसरा अनुभव पुढे एकादे वेळीं देईन. नंतर आम्ही उभयतांनीं महाराजांची कांहींवेळ पादसेवा केली. नंतर त्यांच्या मुखवाक् गंगेचे प्राशन केले. कांहीं वेळानें बाबाच्या हातच्या विभूतीचा प्रसाद घेऊन आणि बाबांची आज्ञा घेऊन आम्ही आमच्या बिऱ्हाडीं गेलों. आम्हीं आमच्या बिऱ्हाडीं गेल्यावर गुप्तपणानें आणलेले औषध घ्यावयास लागलो असतां माझ्या मित्रांनी माझ्या हातून बाटली घेऊन ओतून टाकली. आणि लागलीच म्हणाले येथे औषध घ्यावयाचे नाहीं. मग कांहीं वेळाने आम्ही दोन प्रहारच्या आरतीस गेलों. त्या वेळीं सर्व लोक मोठया भक्तीनें आरत्या व स्तोत्रे म्हणत होते. त्यावेळीं मी महाराजांच्या समोर खांबाला टेकून उभा होतों. तेव्हां माझी पूर्ण खात्री झाली. मी डहाणूस अत्यावस्थ आजारी असून एक महिना स्नान केलें नव्हतें दररोज रात्रीं जीव गलबले. एके रात्रीं तर जीव फारच गलबलला व देहाचे काय होते तें समजेना. परंतु मित्राच्या आग्रहामुळे तसाच शिर्डीस गेलों. वाटेंत श्रीगोदावरीचें जबरदस्तीनें स्नान केले. परंतु प्रकृती बिघडण्याचे ऐवजीं सुधारत चालली. घासभर भात खात नसे त्याचेऐवजीं एक एक बाजरीची भाकरी खाऊं लागलों. आठ दिवसांत प्रकृती उत्तम झाली. परत येतांना एकादशी होती. मला पेरू बाधत असल्यामुळें मी ते कधीं खात नव्हतों. परंतु माझ्या मित्रानीं त्या दिवशीं फराळाकरिता खूप पेरूच घेतले व सर्वांबरोबर मलाही दिले. मी यथेच्छ खाल्ले. परंतु मजा ही कीं मला त्यावेळीं ते बिल्कूल बाधले नाहींत. नंतर मी सुखरूप कल्याण-पर्यंत मित्राच्या बरोबर आलों व मुंबईस गेलों. संतलीला यालाच म्हणतात. बाबांचें स्मरण झालें म्हणजे परमानंद होतो.

( भूपाळी—उठि लवकरि गोपाळा सांवळ्या. या चालीवर. )

**उठा साईबाबा । उठाहो गुरो, देवराया । उत्कंठित बहु भक्तवृंद हा कमल-मुखा निरखाया । उठा साईबाबा ।। धृ.।। त्यजि**

रजनी तिमिर शालु ॥ हा हेमवसन दिन त्याला । करि पक्षीगण मोदें किलबिल ॥ मृदुमंजुळशा बोला विविध मनोहरकुसुमसुगंधित मधु घेउनि आला । शीत समीरण मंद गतीनें गुरुपदनमनाला ॥ १ ॥ उठा साइबाबा, उठा हो गुरो देवराया ॥ उत्कंठित बहु भक्तवृंद हा कमलमुखा निरखाया ॥ उठा ॥ साईबाबा ॥ १ ॥ कुमतिकाकडे जाळुनी सज्जन स्तब्ध उभे राहती । नर नारीगण बाल बालिका शिर प्रेमें नमविती ॥ आस लागली अंतःकरणीं प्रभुपदसेवेची । भक्त शिरोमणी त्यजुनि आले गृहमाया साची । उठा साइबाबा, उठा हो गुरो देवराया॥उत्कंठित बहु भक्तवृंद हा कमलमुखा निरखाया॥२॥ अमर भामिनी यक्ष किन्नरी मधु गायन करिती । गुरुपद दर्शन कांक्षी मुनिजन योगेश्वर ध्याती । पुण्य सरस्वती गंगा गोदा स्नान घालुं पाहाती ॥ कृपा करा हो दासावरी, ही कृष्णतनयविनती ॥ ३ ॥ उठा साईबाबा । उठा हो गुरो । देवराया॥ उत्कंठित बहु भक्तवृंद हा कमलमुखा निरखाया ॥ ३ ॥ उठा साईबाबा.

## आरती श्री साईबाबांची.

व्यक्ता व्यक्त सनातन गुरुस्वरूपीं कवणा । गुरुस्वरुपी कवणा । सत्यज्ञान न म्हणुनि, भक्तया शरणा । ब्रह्मानंदीं स्थित जे युक्त चिदाभरणा । युक्त चिदाभरणा । पाणिद्वय त्यां जोडुनि शिर ठेवित चरणा । जयदेव जयदेव जय श्रीसद्गुरुसाई श्रीसद्गुरुसाई । आरती ओवाळूं तुज पन्नगशायी जयदेव जयदेव ॥१ ॥ साई स्वरुपाची मज खूण मनीं पटली । खूण मनीं पटली । दत्त गुरूची मानव मूर्ती अवतरली । अखंड सुंदर कीर्ति जगतीं दुमदुमली । जगतीं दुमदुमली । ईप्सितदानीं लज्जित कल्पलता झाली । जयदेव जयदेव जय श्रीसद्गुरु-साई श्रीसद्गुरुसाई आरती ओवाळूं तुज पन्नगशायी । जयदेव जय-देव ॥ २ ॥ संकटजलनिधि पासुनि भक्ता मुक्त करी । भक्ता मुक्त

करी । स्वप्नीं दर्शन देउनि धरि कर अभय शिरीं । धीपुर भक्तिण सेवित भरत दिवानन स्वामी । भरत दिवानन स्वामी ॥ शीलधि माजींपाहतां दिसलां तेचि तुम्हीं।जयदेव जयदेव जयसद्गुरु साइश्रीसद्गुरु साई॥ आरती ओंवाळूं तुज पन्नगशायी॥ जयदेव जयदेव॥३॥ रोगी तीर्थ प्रसादें मुक्तचि वहु होती । मुक्तचि वहु होती । हिंदू यवन जनां-वरि सम प्रेमा धरिती । अधिकारासम भक्ता उपदेशा करिती, उपदेशा करिती । कृष्णसुताला आला अनुभव निजचित्तीं । जयदेव जयदेव जय श्री सद्गुरुसाई श्री सद्गुरुसाई॥ आरती ओंवाळूं तुज पन्नगशायी॥ जयदेव जयदेव ॥ ४ ॥

बाबांचा अनुचरानुचर
सखाराम कृष्ण पांगारकर
मु. तिकोने. ता. कोळवण सं. भोर.

## श्री साईनाथ प्रसन्न

अंधेरी ता. २०।६।२५

श्रीसाईबाबाबद्दलच्या माझ्या अनुभवास आपल्या मासिकांत स्थळ मिळण्यास विनंती आहे:—शके १८३५ सालीं अंधेरी गांवांतील चाळ बांधण्यापूर्वी मी गांवाचे बाहेर माझे शेतावरील घरांत बरींच वर्षे राहात होतों. तेथें आमच्या सोबतीला एकही मनुष्य नसे. व तें ठिकाण एकाद्या निर्जन वनासारखें होतें त्याच वेळीं अंधेरी गांवांत चोरांचा सुळसुळाट फारच झाला होता, अशा स्थितींत आम्हाला दुसऱ्या कोणाच्या सोबती खेरीज त्या शेता-वरील घरांत रहाणें फारच धोक्याचें व भयाचें वाटूं लागलें. एके दिवशीं रात्रीं माझ्या स्वप्नांत श्री समर्थ आले व म्हणाले, "अरे घाबरतोस कशाला? उद्यां तुझें रक्षण करण्याला मी दहा पठाण आणून ठेवतों. घाबरूं नको."

१ अक्कलकोट २ अक्कलकोट महाराजांचें नांव ३ शिरडी.

दुसरे दिवशीं सकाळींच बाबांही स्वप्नांत सांगितल्याप्रमाणें फक्त दहाच धोबी मज्याकडे राहाण्यास जागा मागण्यास आले. मी त्यांना राहाण्यास जागा दिली, व ते अद्यापपर्यंत तेथेंच राहात आहेत.

अनुभव नं. २ शेतावरील आमच्या जुन्या विहिरीचें पाणी उन्हाळ्यात आटत असे व नंतर तेथे धोबी रहाण्यास आल्यापासून पाण्याचा फारच तुटवडा पडू लागला. तेव्हां दुसरी विहीर खणण्याचे मी मनांत योजिले. कोणतेही काम मी श्रीसमर्थांच्या आज्ञेशिवाय करीत नसें. म्हणून मी शके १८३५ सात शिरडीस गेलों व विहीर खणूं किंवा नको ते समर्थांना विचारलें. बाबा म्हणाले " अरे, जा विहीर खण मस पाणी लागेल."

नंतर घरीं आल्यावर मी विहीर खणण्याचें काम सुरू केलें. त्या विहिरीस पाण्याचे मोठे झरे लागले. व ते पाणी फारच चांगले आहे.

अनुभव नं. ३ शेतावरील घरांत रहाण्याने आमच्या मुलांच्या शिक्षणाची फारच गैरसोय होऊं लागली. कारण आम्ही रेल्वेलाईनीच्या पलीकडे रहात असून तेथून शाळा अर्धा पाऊण मैलावर आहे. अशा ठिकाणाहून मुलांना एकटयांना शाळेत पाठविणें आम्हास फारच धोक्याचें वाटत होते. तेव्हां मुंबईस किंवा दुसरें एखादे ठिकाणीं घर घेऊन तेथे रहावें अशी माझी उत्कट इच्छा होती, त्याप्रमाणे मी शिरडीस गेलों व समर्थांना म्हणालों, " बाबा, शेतावरील घरांत रहाण्याचा मला कंटाळा आला आहे, व कोठे तरी एखादें घर घेऊन तेथे रहावें अशी माझी इच्छा आहे" बाबा म्हणाले, " अरे तू कांहीं काळजी करूं नको. मी तुला गांवांत घर देतों " नंतर मी घरीं आलों. कांहीं दिवसांनीं म्हणजे शके १८३८ सालांत अंधेरी गांवांतील एक उत्तम प्रकारची जागा विकत घेण्याची मला संधी आली, व मी ती जागा विकत घेतली. आणि बाबांच्या आज्ञेनें तेथें चाळ बांधण्यास सुरवात केली व शके १८४० सांत चाळीचें काम पुर्ण झालें. हल्लीं आम्ही तेथेंच रहात आहोत.

आपला,
रामचंद्र सीताराम देव. मु. अंधेरी



श्रीसाईबाबा-

# श्रीसद्गुरु साईनाथ.

## श्री. सौ. छोटूबाई यांचे आणखी अनुभव

माझ्या एका बाळंतपणाच्या वेळेस असें झाले कीं, मी ४ दिवस अडले. सांताक्रूझ हे ७।८ वर्षांपूर्वी काहीं सवलती सबंधें खेडेगांवासारखेच होते व प्रसंगविशेषी डॅक्टरची गरज लागूं नये म्हणून सुटकेच्या कामीं प्रवीण अशी नर्स आणीत असूं. तथापि श्रीसाई माय माउलीस आपली लीला दाखवावयाची होती. चार दिवस नर्सनें तिची शिकस्त केली. चौथ्या दिवशीं संध्याकाळी ४॥ चे सुमारास ती नर्स माझ्या वहिणीला हळूच सांगूं लागली कीं, मी आतां नुकताच जो उपाय केला आहे त्याच्या पलीकडे माझी मती चालत नाहीं. व आतां मी खालीं जाऊन प्रधान साहेबास सांगतें कीं डॉक्टरशिवाय सुटका होणें शक्य नाहीं. तेव्हां आमच्या वहिणीनें अगदीं हताश होऊन नर्सला ह्मटलें, "४ दिवस काढलेत तशा आणखी ४ मिनिटे थांबा. मीही माझा शेवटचा उपाय करून पाहतें." ती नर्स तिला ह्मणते, "पहा जोखम तुमच्यावर राहील. कांहीं चिन्हांवरून मला आतां दोन जीवांचा मुळींच भरंवसा देतां येणार नाहीं." वहिणीनें तिचें ते बोलणें नीट ऐकूनही घेतलें नाहीं व एकदम श्री बाबांच्या मोठ्या फोटोजवळ पदर पसरून नमस्कार करण्यास बसली व श्री माउलीचा धांवा असा केला कीं, "बा आतां ह्याक्षणीं डॅाक्टर केव्हां येईल ? हें भयंकर अरिष्ट कोण निवारील श्री माउली धांव. तुझेशिवाय आह्मांला कोण तारील, आमचा अंत पा नकोस. कृपा कर" अशा दीनवाणीनें प्रार्थना सुरू केली. व नर्स तर जव बसून हें सर्व पहातच आहे. इतक्यांत मुलगा जन्मला. मलादेखील आश्चर्य वाटलें. रडूं लागला. मीसुद्धां विचारूं लागलें. जन्मला ना ? नर्सच्या हातांश एक सुईण होती.तिचीसुद्धां नर्सला गरज लागली नाहीं. नर्स ह्मणूं लागली हा तुमचा देव आहे तरी कुठें ? ह्या बाईची सुटका नीट होण्याची आमची आशा सुटली होती. मूल तर आंत गुदमरलेंच होतें. एका क्षणांत आह्मांस आज हा चमत्कार दिसून आला आहे. डॅाक्टरला कितीही सांगितलें तरी खरें

वाटणार नाहीं. ४ दिवस तुम्ही माझी मेहनत पाहिलीत व बाईची काय स्थिति झाली होती तीही पाहिलीत. एक मिनिटांत बाबानीं सर्व काळजी दूर केली. माझी बहीण नमस्कार करून बाबांच्या तजबिरीपुढून उठलीसुद्धा नव्हती. ह्यापेक्षां ज्यास्त काय प्रचीती देतील ? क्षणोक्षणीं श्री माय आह्मास तारीत आहे व आपली खूण देत आहे.

**मनु भोजू परदेशी. मु॥ भवूर ता॥ वैजापूर** यांस आलेला श्री साईबाबाबद्दलचा अनुभव रा. रा. रामचंद्र दादा पाटील कोते यानीं लिहून घेऊन पाठविला तो:—

" तीन वर्षांपूर्वी मला फार फेंपरें येत असे. त्या कामीं पुष्कळ औषधोपचार केला परंतु कशानेंही गुण आला नाहीं. फेपरें (फीट) येण्याचें कारण समर्थ शिरडीस असतां मी व माझे मामा असे दर्शनास आलो होतों. व त्यावेळीं माझे मामानीं आमचे कामासंबंधीं नवस केला होता. तें आमचे काम झालें परंतु नवस फेडण्याचें विसरून गेलों. तेव्हां ३ वर्षे अलीकडे वर लिहिल्याप्रमाणे होऊं लागलें. नवसाची आठवण झाली. नंतर समर्थांस विनंती करून दर्शनास आलों. पहिले गुरुवारीं दर्शन घेऊन चुकीबद्दल क्षमा मागितली. पुढें दर गुरुवारीं समर्थाचे दर्शनास येऊं लागलो. असे पांच गुरुवार झाले. शिर्डीस आल्यापासून फेपरें (फीट) येण्याचे बंद झालें. आजपर्यंत पांच गुरुवार झाले. नवस फेडला.

---

आळंदी देवांची ता. १४।५।२५

**श्री. लक्ष्मीबाई ठुसे यांचे श्रीसाईबाबाबद्दल अनुभव.**

श्रीसाईबाबा हें नांवही मला माहीत नव्हतें. अशा वेळीं म्हणजे इ. स. १९१२ त मी माझे वडिलांचे घरीं देवघरांत पूजा करीत होतें. देवघर माडीवरच आहे. मला उपासना श्रीरामजीची म्हणून श्रीहनुमानमूर्ति

पूजेस आहे. पूजा झाल्यावर पुढील माडीवर झोपाळा होता तेथें आलें. समोर जांभळीचे झाडावर एक तेजस्वी माकड दिसलें. तें लगेच खिडकींत आले व क्षणात नाहींसें झाले. रात्रीं स्वप्न पडले त्यांत श्रीसाईबाबा आले व म्हणाले शिर्डींत तुझा राम आहे, तूं तेथें ये. मग माझे गुरूकडून मला शिर्डीची माहिती मिळाली. १९१२ सालीं मी शिर्डीला गेले. तेथें बाबांना पाहिले व स्वप्नांतील मूर्ती ती ही अशी खात्री झाली. तेव्हांपासून बाबा समाधिस्थ होईपावेतों दरसाल दर्शनास जात असें.

१९१७ सालीं मी तेथें गेले असतां दुपारची आरती होऊन जेवण झाल्यावर मला माझ्या शेताबद्दल बाबांना विचारावे असें मनांत आलें. परंतु स्वतः विचारण्याचे धैर्य होईना. म्हणून रा. माधवराव-देशपांडे यांस तुम्ही माझे शेताबद्दल बाबांना विचारा असें सांगितलें. ते म्हणाले आपलें आपण पुसावें.मी मशिदींत आले तों बाबा समोर भितीला धरून बाण्याला शिव्या देत होते. शिव्या फारच अस्सल होत्या. लाल झाले होते.मी दूर उभी राहिलें.दहा मिनिटानंतर कठ्याचे वर जाऊन बाबांचे जवळ बसलें.रा.अण्णा चिंचणीकर जवळ होते. ते बाबांचे पाय दाबूं लागले. रा. जोगही आले. बाबा ह्मणाले अण्णानें काकीला बुडविली. सफाई वाटोळें केलें. मला तरास व्हई दिला.. अण्णा चिंचणीकर जोगास ह्मणाले, मी कोणाचें घेतले नाहीं व कोणाला बुडविलें नाहीं व बाबांना कधीं त्रास दिला? इतक्यांत मजकडे पाहून मला वर बोलाविले व पाय चेंपण्यास दिला व पाठीवर हात फिरविला आणि ह्मणाले "काकी खाऊं दे ग. अण्णाच खातो ना. फिर्याद करूं नको. अल्ला आपणास देईल. कमी करणार नाहीं. तूं, मी व अण्णा नाशिकास राहूं." माझ्या बापाचे नांव अण्णा. माझ्या सावत्र आईचें व माझें जमेना. मला पोटगीकरितां सासऱ्याने जमीन दिली होती ती बाप देईना व घरीं ठेवीना. ह्मणून फिर्याद कर असें कांहीं लोक ह्मणत. बाबांचे आज्ञेप्रमाणें मी फिर्याद केली नाहीं. मला प्रथम त्रास झाला. नंतर नर्स मिडवाईफची परीक्षा पास झालें. बाबांनीं सांगितल्याप्रमाणें अल्ला देत आहे व कमी पडत नाहीं.

## रा. रा. शंकर वासुदेव सोमण राहणार खांडवे यांजला आलेला श्री साईबाबांचा अनुभव.

हे श्री साईबाबांचे भक्त आहेत. रा. रा. गणेश गंगाधर मराठे हे त्यांचे मेहुणे. ह्मणजे त्यांची बहीण त्याना दिली होती. ती हल्लीं ह्यात नाहीं. मि. मराठे यांची दुसरी बायको गरोदर होती. ती व त्यांचा एक मुलगा आणि मुलगी व मि. सोमण असे इ. स. १९१८ सालीं शिर्डीस होते. हे आधींच तेथे गेले होते. आणि मि. मराठे हे बेलापूर नजिकचे खंडाळ्यास होते. तेथून सोमणांनीं त्यांना भेटावयास शिर्डीस कुटुंबानिशीं बोलाविलें ह्मणून ता. १३ जानेवारी १९१८ रोजीं ते तेथे आले होते. तेथे असतां त्यांचे कुटुंबास बाळंतपणासाठीं खांडव्यास घेऊन जाऊं काय म्हणून सोमणांनीं श्रीस विचारिले. बाबा म्हणाले या खेपेस नको. पुढील खेपेस पाहूं. जिकडचे तिकडे होईल तेंच बरें. तेव्हां मि. सोमणानीं तो बेत रहित केला. पुढें मि. मराठ्यांनीं आपले बायकोला बाळंतपणास सातान्यास पाठविली. तेथें प्रसूतीनंतर सुमारे १ महिन्यानें त्यांची मुलगी सुमारें ४ वर्षांची अकस्मात माडीवरून खालीं रस्त्यांत पडून डोक्यास जखम झाली व २।३ दिवसांत तिचा अंत झाला. हा अपघात सातान्यासच घडावयाचा परमेश्वरी संकेत होता. म्हणून बाबांनीं तसें सांगितलें व तसे करून उगीच जनांच्या दृष्टीनें सोमणावर जो अपयशाचा आळ आला असता तो टाळला.

रा० ब० मोरेश्वरराव विश्वनाथ प्रधान बी. ए. एलएल. बी. राहणार शांताक्रूस यांचा श्री साईबाबांबद्दल अनुभवः—

सन १९१० मेच्या अखेरीस मी शिर्डीस पहिल्याने गेलों. प्रथम दर्श-नींच कोणीतरी सिद्धपुरुषाच्या समोर मी उभा आहे असें माझ्या मनांत ठसलें. पहिली भेट फारच आनंददायक होती. बाबास त्याच वेळेस परत जाण्याविषयीं विचारतांच असे उद्गार काढले कीं, "आपण काय रानांत आहोत? दोन चार रोजांनीं जाऊं. मी बी संगती येईन." पहिल्या प्रथमच ७।८ दिवस ठेऊन घेतले. त्या खेपेस दुसऱ्या दिवसापासून बाबा माझ्याकडे पाहून म्हणत कीं, माझे अर्धांग दुखत आहे. तें निर्जीव झाले आहे. कांहीं हरकत नाहीं; अल्लामिया ह्यांतून बरें करील. पण त्या बोलण्याचा त्या वेळेस मला काहींएक बोध झाला नाहीं. शिर्डीहून परत आल्यावर असे दिसले कीं बाबा बोलत होते त्याच दिवसापासून माझी मातोश्री प्यारालीसीसच्या फिटानीं फारच आजारी होती मी मुंबईस पोहो-चलों त्याच क्षणीं बाबांच्या पायांचे तीर्थ व त्यांची उदी हीं मातोश्रीस दिल्याबरोबर तिच्या दुखण्याचें भयंकर स्वरूप बदलून त्याच रात्रीं तिच्या-विषयीं काळजी करण्याचे कांहींच कारण नाहीं अशी सर्व मंडळीची खात्री झाली. ती त्या दुखण्यांतून बरी झाली व त्यानंतर १॥ वर्षांनीं शिर्डीस बाबांच्या दर्शनाचा लाभही घेऊन आली. वरील हकीकतीवरून बाबा कसे सर्वज्ञ व सर्वसाक्षी होते आणि त्यांच्या उदींत आणि चरणतीर्थांत काय शक्ति आहे त्याची खुण मला पक्की पटली.

त्याच खेपेस एकदां बाबांच्या जवळ नानासाहेब चांदोरकरांचे दोन्ही पुत्र व मी असतांना बाबा त्रयोदशाक्षरी राममंत्राचा उच्चार करूं लागले. कांहींवेळ स्वतः तोंडाने मंत्रोच्चार केल्यावर मजकडे पाहून म्हणत्वात कीं, काय बोलत असावें रे? त्या दिवशीं बाबांनी हांडी स्वतः शिजविण्यास चढविली होती. व बाबांनीं सर्व मंडळीस बाहेर काढून नानासाहेबांचे बाबूस, बापूस व मला अशा फक्त तिघांसच जवळ राहूं दिलें होतें. ती

हांडी शिजत असतांना पाहाण्याची मोठीच मौज वाटे. तेथें माझे लक्ष लागलेलें होते. एक दोन वेळा बाबानीं जणुं काय हळु गायन स्वरांत गुणगुण करितात तसा पुन्हां मंत्रोच्चार केला व तिसऱ्या वेळीं अगदीं मज-कडे रोखून पाहून स्पष्ट म्हणूं लागले, कायरे काय म्हणावें ? "श्रीराम जय-राम जयजय राम." एवढे म्हणताच माझे सर्व शरीर जणूं काय एकदम झोपेतून जागे होतें त्याप्रमाणे होऊन मी कांहींएक न बोलतां एकदम बाबांच्या पायांवर मस्तक ठेविले. व त्या विधींत माझे प्रेमाश्रू श्रींच्या पायावर पडले. बाबा गप्प राहिले. व दुसऱ्या गोष्टीकडे आम्हां तिघांचें लक्ष लावूं लागले. तरीपण चांदोरकरांचा दुसरा चिरंजीव बापू ह्यानें मला विचारलें कीं, अहो, एकाएकीं तुमचे डोळे भरून येऊन तुम्हीं बाबांच्या पायां कां पडलां ? मीं त्यास सांगितले कीं, कांहीं वेळानें सांगेन. श्रीमाय माउलीनें स्वतः होऊन माझ्या दीक्षेची मला जाणीव देऊन तिची रात्रंदिवस कशी जागृती असावी ह्याची मला सूचना दिली व हा सर्व प्रकार किती कौतुकाने बाबांनीं केला हे पाहून त्या दोन्हीं मुलांस फारच आनंद वाटला. त्या ७।८ दिव-सांच्या दरम्यान ठिकठिकाणचे रंजलेले गांजलेले लोक शिर्डीत बाबांजवळ येत होते ते आम्हीं पाहिले. व त्या सर्वांची निगा बाबा आपल्या मुलांप्रमाणें करून त्यांची रवानगी कशी करीत असत हेंही आम्हीं पहात असूं.

त्याच खेपेस गुरुवारीं दुपारीं बाबांनीं मला लेंडीवर नेले. बाबू, बापू हेही बरोबरच होते. बाबांनीं त्यांच्याबरोबर कांहीं धान्याचे दाणे आणले होते. व मजकडून त्या जागेवर दाणे पेरविले. हा प्रकार पहाण्यास. लेंडीवर बरीच मंडळी जमा झाली. व कांहीं मंडळींनीं घागरींतून पाणी आणून पेरलेल्या जागीं तें शिंपू लागली. ही वेळ बाबांची लेंडीवर येण्याची नव्हे. पण बाबा मुद्दाम ह्या पेरणीकरितां लेंडीवर अकाळीं आले असें म्हणूं लागले. ही लेंडीची जागा हल्लीं बाबांच्या संस्थान इष्टेटींत सामिल झाली आहे आणि तेथें हल्लीं संस्थान कमिटीनें आमराई लावली आहे.

ह्याच लेंडीच्या जागेवर बाबांनीं सन १९१८ च्या मे महिन्यांत सकाळीं लेंडीवरून मंडळीस नित्याप्रमाणें रवाना केल्यावर कांहीं मिनिटानीं

मला "प्रधान" अशी हांक मारून लेडीच्या दिव्याच्या ज्योतीजवळ उभे राहून काहीं आशिर्वादात्मक प्रकार केला तो त्या वेळच्या काहीं मंडळींनी पाहिलाच आहे. त्याचा अर्थ तेव्हा जरी स्पष्ट कळला नाही तरी तुजवर जरी आकाशही कोसळले तरी घाबरूं नकोस अशा तऱ्हेचा तो असावा असे आता मला वाटूं लागले आहे.

सदरहू पहिल्या भेटीच्या आठवडयांत एके दिवशीं बाबाजवळ बसलो असतां बाबांनीं अबदूल यास हाक मारली व म्हणाले, धुनीतली चिलीम आण. त्यानें चिलीम बाबाजवळ देतांच बाबा त्याच्यावर संतापले व स्वत: चिलीम दुरुस्त करूं लागले. श्री साईबाबा कोणतीही गोष्ट स्वहस्तें करूं लागले म्हणजे ते इतक्या नाजूक रीतीने व कुशलतेनें करीत असत कीं ते त्यांचे कृत्य पहाण्याची मोठी मौज असे. बराच वेळ ती साफ केल्यावर मजकडे पाहून म्हणाले,"भाऊ, ही पहा आतां कशी चागली दिसते,नाहींतर त्याने आणली तेव्हां कशी वेडी वांकडी होती." मी धीर करून म्हणालों, "बाबा, ती आपण स्वत: केलीत म्हणून इतकी चांगली दिसते." बाबा म्हणाले, "मी नाहीं बा ही नीट केली. ही त्वा मला दिली." मी हासत म्हणालों, "बाबा, मी केव्हां आपणास ही दिली?" ते म्हणाले, "अरे, आज सहा वर्षें झालीं त्वां दिलेली चिलीम मी ओढतों." असे म्हटल्यावर मी स्तब्ध झालों व श्रीस नमस्कार केला. पण त्या सर्व संभाषणाचा खुलासा अजून मला झाला नाहीं.

त्याच खेपेस दुपारच्या वेळीं एके दिवशी बाबा जवळ असतांना एकाएकीं आकाश भरून आलें, व दहा पधरा मिनिटांत जोराचा पाऊस पडूं लागला. पाऊस पडतेवेळीं माझ्या मनांत असें आले कीं घरून एक दोन दिवसांच्या बोलीनें मी येथे आलों व बाबा तर घरीं जाण्याची परवानगी देत नाहींत. पाऊसही जोराचा सुरू झाला. नदीला आतां नाव असेल परत जातेवेळीं काय स्थिति होईल कोण जाणे. असे प्रपंचिक विचार माझ्या मनांत येत आहेत तोंच बाबा आकाशाकडे पाहून म्हणतात."अरे अल्ला! अबी बरसात पुरा कर. मेरे बाल बच्चे घेर जानेवाले है उनकू सुखसे ज्यानदे," असें बोलतांच पाऊस हळु हळु कमी झाला व

तत्क्षणीं माझ्या मनाची खात्री झाली कीं आपले अंतस्थ विचार बाबांस त्वरित कळतात. अर्थात् परत येतेवेळीं आम्हीं तिघे म्हणजे बाबू, बापू व मी फार सुखांत प्रवास करून पंजाबमेल मिळणे अगदीं अशक्य होते तरी ती पंजाबमेल त्याच दिवशीं मनमाडास आम्हास मिळाली व त्वरित मुंबईस आलों. त्यामुळे श्रीचें तीर्थ व उदी वर सांगितल्याप्रमाणें त्याच दिवशीं संध्याकाळीं माझ्या मातोश्रीस पोहोंचवून तिचे भयंकर दुखणे बरं झाले. मी ज्या दिवशीं घरीं परत आलो त्याच रात्रीं माझ्या मेहुणीस स्वप्न पडलें कीं, आमच्या घरीं एक कफनी घातलेला व डोकीस फडका बांधलेला फकीर आला आहे. सकाळीं स्वप्न ऐकल्यावर 'मीबी तुझ्यासंगती येईन' असें बाबा जे बोलले होते त्याची मला आठवण झाली. व त्या स्वप्नाप्रमाणे आमच्या घरीं बाबा खरोखर आलेच आहेत अशी सर्व प्रकारे दिवसेंदिवस खात्री होऊं लागली. ह्या पहिल्या बाबाच्या भेटीची आठवण झाली म्हणजे माझें अंतःकरण बऱ्याच कारणानीं भरून येतें. खरोखर जगांतील सर्व सुखे संतसहवासाच्या सुखाच्या खालींच अशी माझी दिवसेदिवस खात्री होत चालली आहे. व खरा संत ओळखण्यास आपल्यावर संतकृपाच झाली पाहिजे, असे वाटूं लागलें आहे. श्रीच्या समाधीजवळ उभे राहिलें असतां आपण श्रीच्या हयातींत जसें उभे राहत होतों तसाच भास अजून होतो. मशिदींत बसलों म्हणजे तेथील धुनी वगैरे सर्व देखावा पाहून साईबाबा आपणाजवळ बसलेले आहेतच असा आनंद होतो. म्हणूनच ज्याच्या हातून श्रीची त्या जागेवर अर्चनभक्ती घडते ते खरोखर पुण्यवान् असें मी समजतों. व कांहीं कांही वेळीं ज्यांना श्रीच्या हयातींत शिर्डीचे दर्शन घडलें नाहीं व ज्यांनीं श्रीची लीला कर्णोपकर्णी ऐकून तेथें येऊन जी त्यांची प्रखर भक्ती दाखवितात ती पाहून संतांचा कोंव्हांही अंत होत नाहीं अशी खात्री पटते.

श्रीराम जयराम जयजय राम

## रा. ब. मोरेश्वर विश्वनाथ प्रधान यांस आलेले अनुभव.

नाना तऱ्हेच्या लोकांचे नाना तऱ्हेचे विचार असावयाचेच. आम्हीं शिर्डीस जाऊं लागल्यापासून आमच्यापैकीं कांहीं आतवर्गांत चिकित्सा होऊं लागली कीं काय हे लोक? हिंदूंचे देव धर्म सोडून मुसलमानाच्या नादीं लागले आहेत! त्याच्या पाया काय पडतात! सदोदित 'बाबा बाबा' काय करतात! अशी आमच्या पश्चात निंदेची सुरवात झालीच होती. अशी बाबांची खरी जाणीव न झाल्यापैकीं एक बाई आम्हांकडे राहावयास आली होती. तिनें आमचे येथे रात्रीं स्वप्नांत आमच्या ओटीवरून आमचे देव घरांत एक पांढरी कफनी घातलेला फकीर जातांना पाहिला व स्वप्नातच विचार करूं लागली, हा फकीर एकदम असा यांचे देवखोलींत कसा शिरला? म्हणून ती देवखोलीकडे गेली. पहाते तो वे. शा. सं. तेलंगी महादेव भटजी देवाची पूजा आटोपून बाहेर निघून गेले. स्वप्नातच ती बाई विचार करते कीं मी मुसलमान फकीर आंत जातांना पाहिला व तोच इसम बाहेर पडतांना मला पूज्य ब्राह्मण कसा दिसला? व लगेच ती बाई जागी झाली व स्वप्न सर्वांस सांगूं लागली. स्वप्नाचा अर्थ काय तो करण्याची कांहींच गरज नाहीं. संतांचें जे प्रेम भक्तांवर तेच इतरांवर कसे असते त्याचा हा स्पष्ट दाखला आहे. कारण ह्याच बाईस पुढें आपल्या मुलाबाळांसह श्रींच्या समाधीचे दर्शनाचा सुयोग घडून आला.

सन १९१० नंतर श्री सद्गुरूचा महिमा हळूहळू सर्व हिंदुस्थानभर फैलावत चालला. सन १९१५ सालाच्या सुमारास मुंबई इलाख्यांतील मोठया शहरापैकीं असे एकही शहर बाकी राहिले नव्हतें कीं जेथें श्री माय माऊलीची लीला जाहीर झाली नव्हती. त्या सुमारास मुंबई हायकोर्टांत एकदां एका प्रसिद्ध वकिलानें दुसऱ्या एका वकिलाचे अंगावर (पेंडन्टरुपी) असलेल्या श्रींच्या मीनीएचर तसबिरीस हात लावून सहज विनोदानें म्हटलें कीं त्यांना काय हो केस आरंभ करतांना जरा बाबांच्या तसबिरीकडे पाहिलें म्हणजे केस त्यांच्या तर्फे झालीच" कर्मधर्मसंयोगानें श्रीनें पेंडन्ट

धारण करणाऱ्या वकिलास एक टाकाऊ कामांत त्वरीत यश दिलें. श्रीमाय माउलीचें कौतुक लिहावे तितकें थोडेच.

हुबळीचे सुप्रसिद्ध श्री सिद्धारूढ स्वामी महाराजांच्या काहीं प्रेमळ भक्तांनी त्यांच्या लीला पोथीरुपानें प्रसिद्ध केल्या आहेत. तो ग्रंथ वाचून पाहतां त्यांत एकही अध्याय असा सांपडत नाहीं कीं ज्यांत श्री साई बाबांच्या दरबारांत व त्यांच्या भक्तमंडळीस वेळोवेळीं घडून आलेले चमकार व अनुभवाचे दाखल्याप्रमाणे हुबेहुब दाखले नाहींत. मात्र श्री साई बाबांच्या भक्तापैकीं बहुतेकांनीं त्यांचे पदोपदीं आलेले चमत्कार व अनुभव टिपून ठेवले आहेत असें मात्र अजून दृष्टीस येत नाहीं. हे तरी श्री साईबाबांच्या पूर्ण फकीरीच्या बाण्याचें एक लक्षणच आहे असें म्हणावें लागतें.

( ३९ )

## श्री. साईबाबासंबंधें के० वा० गणपतराव ताम्हणे यांनी ऐकिलेली एक गोष्टः—

बाबा म्हणतातः– काका मी लहान होतों. जालनावरून लांब जात होतों. जातां जातां मला आंब्याचें एक झाड लागलें. त्या झाडावर सुंदर फळें पिकलेलीं होतीं. कांहीं खालीं पडलीं होतीं. मी म्हटलें काय हो सुंदर फळें आहेत ! एक फोडलें तर त्यात किडे. दुसरेंही तसेंच. अशीं ३।४ फोडून पाहिलीं सर्व सारखीं. एक बुवा आला, त्याला विचारलें हे रे असें काय? तो म्हणाला, त्याची फळें कोणी खात नाहींत, वाईट आहेत. मग मी लोहाराकडे गेलों. तेथून खिळे आणले व त्या झाडाला ते ठोकून त्यांत भरले. पुन्हां कांहीं दिवसांनीं मी त्या वाटेनें परत आलों. मग पहातों तर फळें ख्य गोड. सगळे खाऊं लागले. ( एवढी गोष्ट सांगितल्यावर १०।५ मिनिटांनीं दोन इसम पददर्शनाला आले. त्यांना बाबा म्हणाले, ) एकाचीं मुलें जगत नव्हतीं. एकाला ४।५ मुलगे होते. ते दुष्ट होते. बापालाही मारीत, तंटे भाडणें करीत.' दोघांनीं बाबांला आपली हकीकत सांगितली. बाबा म्हणाले, "अल्ला अच्छा करेगा. गरिबोंका अल्ला मालीक." ५।६ महिन्यांनीं ते पुन्हां आले. ज्याला मुलगा होत नव्हता त्याला मुलगा होऊन ४ महिन्याचा होता, आणि दुसऱ्याचे मुलगे चांगले निवळले असें ते म्हणूं लागले.

( ४० )

महाराजांचा उपदेश पुष्कळदां तुटक वाक्यांच्या रुपानें असे. त्या तुटक वाक्यांचा खरा बोध तावडतोब होत असे असे नाहीं, कित्येक वेळां तीं वाक्यें उच्चारल्यानंतर कित्येक महिन्यांनीं किंवा वर्षांनीं अशी परिस्थीति उत्पन्न होत असे कीं तीं वाक्यें जणू काय रामबाण औषधासारखीं लागू पडत असत. त्या परिस्थीतीच्या वेळीं महाराजांच्या प्रेरणेनें तीं वाक्यें एकदम डोळ्यापुढें येऊन त्यापासून अत्यंत हितकारक परिणाम होत असत आणि तसें अजूनही होतात अशा तऱ्हेचा एक अनुभव खालीं देत आहें.

एकदां दोन गृहस्थ ज्यांचा परस्पर स्नेह पुष्कळ वर्षांचा जुना होता त्यांच्यांत थोडा बेबनाव झाला. त्याचें कारण असें:—त्यापैकीं एक गृहस्थ त्या दुसऱ्या गृहस्थाकडे गेले असतां त्या दुसऱ्या गृहस्थाचा कांहीं कारणा-

मुळे क्षोभ झाला आणि ते आपल्याकडे आलेल्या मित्राला टाकून बोलले. तें बोलणें आलेल्या मित्राला अत्यंत लागलें. आणि ते ताबडतोब आपल्या घरीं निघून गेले, आणि घरीं गेल्याबरोबर त्या दुसऱ्या गृहस्थाकडे आपला माणूस पाठवून त्याच्याकडे असलेलीं आपलीं काहीं पुस्तकें ताबडतोब परत मागवून घेतलीं. ते दोघेही गृहस्थ माझे स्नेही असल्यामुळे दोघांचीहीं गाऱ्हाणीं मज-कडे आलीं, आणि त्या वेळेला मला महाराजांनीं कांहीं वर्षांपूर्वीं उच्चारलेलीं दोन वाक्ये एकदम आठवलीं. या दोन्ही गृहस्थांचा महाराजावर पूर्ण विश्वास असल्यामुळे मी त्यापैकीं एक वाक्य त्यापैकीं एका गृहस्थाला सांगितलें व दुसरें वाक्य दुसऱ्याला सांगितलें. चमत्कार हा कीं, त्यांनीं तीं वाक्यें ऐकल्याबरोबर त्याच्या मनाचा क्षोभ नाहींसा होऊन ते पूर्ववत् एकमेकांचे स्नेही झाले. जे गृहस्थ टाकून बोलले होते त्यांना जे मी महाराजांचे वाक्य सांगितलें तें येणेप्रमाणें."तूं कोणाला बरें बोलूं नकोस वाईट बोलूं नकोस. तूं कोणाला वाईट बोललास तर मला दुखणें येतें." यावरून अर्थात् माझ्या ज्या मित्राला मी हे वाक्य सांगितले त्याना असे पटले कीं आपण जें मित्राला टाकून बोललों ते फार अयोग्य केलें आणि असे केल्यानें आपण आपल्या जुन्या मित्रालाच दुखवलें असें नव्हे तर महाराजानासुद्धां दुखवले. अर्थात् असें टाकून बोलणें वर्ज्य केलें पाहिजे. यावरून असाही बोध ठसतो कीं, सर्व भूतमात्रामध्यें महाराज भरलेले आहेत आणि कोणच्याही व्यक्तीला दुखवणें म्हणजे त्याना दुखवणें आहे.

माझ्या दुसऱ्या मित्राला मी जे बाबांचे वाक्य सांगितले ते असे:- "आम्ही लोक असे आहोंत कीं भांडूं तर एकमेकांच्या उरावरसुद्धां बसायला कमी करणार नाहीं.पण आम्ही कधींही एकमेकाला बिछडणार नाहीं." (सोड-णार नाहीं ) ह्या वाक्यावरून माझ्या मित्रानें बोध घेतला तो असा कीं, आपले जुने मित्र आपल्याला नुसतें टाकून बोलले एवढयाचमुळें आपण त्यांचा संबंध तोडायला तयार होऊन आपलीं पुस्तकें त्यांच्याकडून ताबडतोब मागवून घेतलीं हें फार अयोग्य केलें, आणि असें वर्तन महाराजांच्याकडे कधींही रुजू होणार नाहीं. एकंदरींत दोघांनाही आपापल्या कृतीबद्दल पश्चात्ताप होऊन ते पुनः परस्पर स्नेही बनले.

फकीर पीरमहमद उर्फ बडे बाबा किंवा फकीर बाबा यांना नागपुर मुक्कामीं गेल्या जानेवारी महिन्यांत देवाज्ञा झाली, हे कळविण्यास आम्हास वाईट वाटते. हे मालेगावचे राहणारे. यांचा मूळ पेषा फकीरीचा, सन १९०९ सालीं हे शिर्डीस येऊन राहिले ते नव्हा चावडींत राहात. आणि त्यांना मशिदींत येऊं देण्याविषयीं हुकुम मागितला तरी महाराज देत नसत. त्यांनीं चावडींत बसावें आणि किताब ( कुराण ) पढत रहावें असा नेहमीं हुकुम होत असे. अशा तऱ्हेने काहीं महिने गेल्यावर महाराजांनीं त्याना मशिदींत येण्याची परवानगी दिली.

महाराजाचे दरबारात फकीर बाबांना मोठा मान देण्यांत येत असे. सकाळच्या न्याहारीच्या वेळेपासून दुपारचें जेवण होईपर्यंत फकीर बाबाचा मुक्काम मशिदींत असे. न्याहारी व जेवण या दोन्हीं प्रसंगीं महाराज त्याना शेजारीं बसवून घेऊन आपल्या हातानें त्याना खाण्याचे पदार्थ देत असत. एरव्हींही कोणी काहीं भेट किंवा फळें महाराजापुढे ठेवल्यावर महाराज त्यांतील भाग प्रथम फकीर बाबांस देऊन नंतर इतर मंडळींस वाटीत असत. आपल्या भक्तांस शिक्षण देण्याच्या ज्या महाराजाच्या विशिष्ट पद्धति होत्या त्यांतील फकीर बाबांचे शिर्डीचें वास्तव्य व त्यांच्याशीं महाराजांची वागणूक हें एक महाराजांचे साधन होतें. या साधनापासून पुष्कळ बोध घेण्यासारखा होता व त्याचे विवेचन आम्हीं पुढे स्वतंत्र लेखानें करणार आहोंत.

## रा. रा. हरेरामकृत.

अभंग.

**चला चला उठाउठी । सांईबाबांच्या राउटी ॥**
**नलगे मृदंग टाळ कुटी । कर्म कटकट ॥ १ ॥**

**नको पूजा अर्चा कांहीं । वाट न पुष्प फला पाही ॥**
**दक्षिणेची गरज नाहीं । मागे सद्भाव ॥ २ ॥**

रस्तोरस्तीं भेटी होती । जन आम्हांतें फसविती ॥
नाक तोंड दावूं सांगती । राहा सावध ॥ ३ ॥
मना येई काकुळती । म्हणून दत्त बोलविती ॥
खेद नका आणूं चित्तीं । हरी रामाचा ॥ ४ ॥

रा. रा. ह. सी. दीक्षित हे श्री० साईसमर्थांचे दर्शनास गेल्या वेळीं निघालेले बाबांचे बोल.

बाबांचे बोल ९।२।११

कोण आले! रात्रीं आलास का? ( सकाळीं फेरी करीत असतांना धूळ भेटीचे वेळीं )

देख लेंगे. अल्ला मालिक है. ( परसाकडून परत येतांना )

पूजेच्या वेळेस

सगळें मिळेल पण वखत लागेल. द्रव्य घेऊन गेला. त्याच्या पाठीमागें दहा बारा लोक गेले. एकानें त्याचा डावा खांदा मोडला. पुढे त्या खांदा मोडणाऱ्याला एकीकडे नेऊन त्याला फांशी दिलें आणि आपलें द्रव्य त्याजकडून घेतलें.

या गांवांत फकीर व मी असे दोघेच होतों. मी लहान होतों. गांवांतले सगळे लोक रुईला जाऊन राहिले. मग फकीरांनीं दहा गाड्या आणविल्या. रुईच्या लोकांना निरोप पाठविला कीं, पाहिजे तर एक दोन गाड्या घेऊन जा. ते आले नाहींत. मग फकीरानें सांगितलें कीं गाड्या परत घेऊन जा. मग मी एकटा सावळ विहिरीला सगळ्या गाड्या घेऊन गेलों.

श्रीसाइनाथ प्रसन्न.

ठाणें ता. १९–६–२५

रा. रा. श्रीसाइलीलाकर्ते यांस सा. न. वि. वि.–खालील संस्कृत पद्यरूपी बिल्वपत्र श्रीसाई अंबिकेच्या चरणारविंदीं अर्पण करण्याकरितां

पाठविले आहे त्यास आपल्या सन्मान्य श्रीसाईलीलेच्या एखादे अंकीं जागा मिळेल अशी आशा आहे.

संस्कृत पद्य

( ' कवणे तुज गांजियले सांग सुंदरी ' या चालीवर. )

धांव धांव धांव धांव मम प्रियांबिके ।
दीनदास-बाल-विहग-साइ-चंद्रिके ॥ धृ ॥

भक्त-काम-कल्पलते । धीर-वीर-सच्चरिते ।
अतुलकृते स्वात्मरते । साइ-त्र्यंबके ॥ १ ॥

नाशय मे मति-दुरितं । बाल-मनः कुरु मुदितं ।
भिंदि भवग्रंथि मये । साइ-नंदके ॥ २ ॥

दुष्ट-भीम-चंड-घोर क्रूर-पाप-प्रखर-निकर ।
काम-दनुजमंब छिंदि । अंतकांतके ॥ ३ ॥

दुर्गतिदं बहुकलुषं । लोभ-मोह-मद-महिषम् ।
तव करुणा- घनशूलैः । प्रजहि चंडिके ॥ ४ ॥

नित्य शिवेऽखिलविभवे । पाहि पाहि साइ-शिवे
शरणागत बाळ-मये । साइ-मातृके ॥ ५ ॥

साइ-जननि साइ-तात । साइ-देवि साइनाथ ।
दर्शय ते चारुपदम् । मुक्ति-दायके ॥ ६ ॥

स्वीकुरु मे विनतिमिमाम् । सकलानां भुवनानाम् ।
विश्रामस्थलमसि त्वम् । साधु-नायिके ॥ ७ ॥

अर्थ—हे माझे प्रियकर साई माते, धांव त्वकर धांव. तूं ह्या गरीब दास बाल चकोरास तुझे कृपारूपी अमृतकिरण खाऊं घालणारी त्याची चंद्रिकाच आहेस.

(१) हे साइ-त्र्यंबके पार्वति, तूं भक्तांचे मनोरथ पूर्ण करणारी कल्पलता आहेस. तसेच तुझे चरित्र धैर्य, पराक्रम व सत्य यांनीं भरलेले आहे. तुझ्या कृतीला तुलना नाहीं. तूं नेहमीं आपले ठिकाणींच रमलेली आहेस.

(२) हे साइ-खडगे माझ्या बुद्धींत भरलेल्या पातकाचा नाश कर. अज्ञानी जो बाल त्या माझे मन आनंदित कर. व माझी संसारग्रंथि तोडून टाक.

(३) हे कालाचा अंत करणारे आई साईमाते, दुष्ट भयंकर असह्य घोर पातकी, निष्ठुर कडक तन असा जो वासनारूपी राक्षस त्याच्या चिंधड्या कर.

(४) हे उग्ररूप धारण करणारे महिषासुरमर्थिनी चंडिके दुर्गे दुर्गति देणारा भयंकर पातकी अशा माझ्या, लोभ, मोह, व मदरूपी टोणग्याचा तुझ्या कृपारूपी जाड शूलानीं वध कर.

(५) हे साइमाते, साइशिवे, तूं नित्यकल्याणकारी आहेस.सर्व वैभवांनीं भरलेली आहेस.शरणागत आलेल्या ह्या अज्ञान बालकाचें रक्षण कर.

(६) हे मुक्ति देणारे साइमाते, तूंच माझी आई, तूंच माझा बाप, तूंच माझी देवता व तूंच माझा नाथ आहेस. तुझ्या सुंदर मनोहर पायांचें दर्शन दे.

(७). हे साधुसंतदेवतेच्या मुख्य दैवते, तूं सर्व भुवनांचें विश्रांतिस्थान आहेस. म्हणून माझी हीं विनंती मान्य कर. ( मजवर कृपा करून माझ्या षड्रिपूंचा नाश कर, व मला तुझ्या पायांचें दर्शन देऊन मुक्तपदाला ने एवढी माझी अज्ञानाची विनंती मान्य कर. )

बाबांचें बाळ.

## श्रीदत्तसमर्थ

मु. नांदेड ( निजाम. )

श्रीयुत "सांईलीला" मासिक पुस्तककर्ते यांस---

सा न. वि. वि मीशके १८३८ मध्ये साधुवर्य श्रीसांईबाबा याची कीर्ति ऐकून त्याच्या चरणदर्शनास गेलो होतों. त्यावेळीं महाराजांची निस्पृह व सात्विकवृत्ति पाहून फारच आनंद वाटला. मला साधारण कविता करण्याचा नाद असल्यानें महाराजांचे दर्शन झाल्यावेळीं माझ्या तोंडांतून महाराजांविषयीं जे उद्गार निघाले ते तेथे असतेवेळींच कवितारूपाने लिहून काढले होते. हल्लीं आपण सांईलीला नावाचे मासिकपुस्तक काढीत असल्याचे समजलें. इतकेंच नाहीं तर या पुस्तकाचा एक अंकही माझ्या वाचण्यांत आला. यावरून माझी कविता आपणाकडे पाठविल्यास त्याचा या पुस्तकात चांगला उपयोग होईल, असे वाटून हल्लीं पत्रासोबत " श्रीसांईनाथ पदवंदनाष्टक " ही कविता आपणाकडे पाठविली आहे. तरी कृपा करून चालू महिन्याच्या अथवा पुढच्या महिन्याच्या अंकांत या कवितेला स्थळ देऊन मजला आभारी कराल ही आशा आहे.

या कवितेवरून महाराजांच्या विषयीं नांदेडसारख्या दूरदूरच्या प्रांतापर्यंत किती आदरबुद्धि आहे तें दिसून येईल. दूर राहाणारा परंतु महाराजांची कीर्ति मजला त्यावेळीं येथे देखील समजून मी धांवून गेलों होतों.व भाविक लोकास ही कविता नित्य पाठांत ठेवण्यायोग्य असल्यानें भक्त मंडळींत हिचा चांगलाच उपयोग होईल,असें मला वाटल्यावरून आपणाकडे ही पाठविली आहे. तिचा अनादर होणार नाहीं ही पूर्ण आशा आहे.

आपला:

वैशाख व॥ १३<br>१८४७

दत्तात्रेय अनंत सराफ कंधारकर<br>उर्फ दत्तकिंकर बाजार चौक<br>मु. नांदेड ( निजाम )

## श्रीसाईनाथ पदवंदनाष्टक.

शार्दूलविक्रीडित.

आला काय ? कबीर हा[1] पुनरपी साक्षात् मला भासला ॥
ज्याची कीर्ति बहू, जया मद नसे, सांई असा भूतला ॥
ज्याचा दर्शनलाभ तो मिळविण्या, शिर्डी पुरीं सुस्थला-॥
येती सज्जन, तोचि संत नयनीं सांई प्रभू देखिला ॥ १ ॥

जेथें भक्त सदा बहूत वसती सेवावया तत्पदा ॥
तेथें दुःख कदा न, सौख्य गमतें ' जो वारितो आपदा ॥
ज्याचें दर्शन घ्यावयास मनिंचा उल्हास जोरावला ॥
त्याच्या पूर्ण कृपेमुळेंच नयनीं शिर्डीस तो देखिला ॥ २ ॥

प्रांता ' कोपरगांव, नाम वदती गोदातटीं तालुका—॥
तेथोनी जवळीच ' शिर्डि, नगरी, तेथें करी कौतुका ॥
सेवेसी रतले सुभक्तहि बहू ज्याच्या पदा पाहुनी ॥
तो सांई बघुनी मदीय मनही गेलें तिथें मोहुनी ॥ ३ ॥

खेडें शिर्डि परी सुरम्य नगरी सांईमुळें भासली ॥
ज्यांना पुण्यबळें अशी गवसली ही कामधेनू[4] भली ॥
होती धन्य खरे जगीं सुजन ते वास्तव्य ज्यांचें तिथें ॥
कांहीं पुण्य मदीय ही म्हणुनियां देखीयलें सांईतें ॥ ४ ॥

---

१ सांई. २ उचंबळणें. ३ नानातऱ्हेचे चमत्कार. ४ भक्तांचे मनोरथ पूर्ण करणारे सांईबाबा.

ज्याच्या सन्निध ती रमा नत परी ना गर्व अंगीं वसे ॥
ना ठेवी जवळी कपर्दिक करें सर्वांसि वांटीतसे ॥

जो पाहीं समदृष्टिनें सकळिकां म्लेंच्छां, द्विजां, हिंदुसीं ॥
सांई तो निजलोचनीं नमियला देखोनियां शिडिसीं ॥ ५ ॥

ज्यातें चामर, छत्रही असुनि जो, सिंहासना टेकतो ॥
धूनी लावुनियां मशीदित वसे, भक्तींस जो भाळतो ॥

भाळीं गंध सुगंधि लेवुनि उटी भक्तीं सदा वेष्टिला ॥
तो सांई प्रभु शांत दांत बरवा शिर्डीं पुरीं देखिला ॥ ६ ॥

होती मानस पूर्ण ज्या प्रभुकृपें तत्कीर्ति मी ऐकुनी ॥
सांईपाद नमावया अतिमुदें गेलों तिथें धांवुनी ॥

अठ्राशें अडतीसच्या नलशकीं वैशाख शुद्धांतरीं—॥
झालों चौदशिं सांइनाथ बघुनी मी धन्य या भूवरी ॥ ७ ॥

भो ! साधो ! जगिं दत्तरूपि वससी दासास तारावया ॥
कीजे धन्य मला करीं धरुनियां, अज्ञान नेई लया ॥

सद्बुद्धि स्मरतां तुझें पद वसो सेवा घडो सर्वदा ॥
झालासें नत 'दत्तकिंकर, तया दाऊं नको आपदा ॥ ८ ॥

नम्र दत्तकिंकर कंधारकर
नांदेड ( निजाम. )